


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक


● वर्ष : ०१ ● अंक : ३४५ ● पुणे ● गुरुवार, दि. २४ ऑक्टोबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



काकासाहेब चव्हाण यांचा उपक्रम ठरतोय सरस 3



मलाबार गोल्ड ॲण्ड डायमंड्सकडून... 4

## ठळक बातम्या

### संभाजी ब्रिगेड 50 जागा लढविणार

**पुणे : (आरंभ पर्व)** संभाजी ब्रिगेडने शिवसेना (ठाकरे) पक्षाबरोबरची युती तोडण्याचा निर्णय घेतला आहे. विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या कोट्यातून किमान चार ते पाच जागा देण्याचे आश्वासन शिवसेना नेत्यांनी न पाळल्याने हा निर्णय घेण्यात आला असून, संभाजी ब्रिगेड विधानसभेच्या 50 जागा स्वतंत्रपणे लढविणार आहे. संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष ॲड. मनोज आखरे, मुख्य प्रवक्ते गंगाधर बनबरे, उपाध्यक्ष अभिमन्यू पवार आणि प्रदेश संघटक संतोष शिंदे यांनी ही भूमिका बुधवारी पत्रकार परिषदेत जाहीर केली. या वेळी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर घाडगे, प्रदेश सहसंघटक मनोजकुमार गायकवाड, शहराध्यक्ष अविनाश मोहिते, उपाध्यक्ष ज्योतिबा नरवडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

### बापू भेगडे बंडखोर

**पुणे : (आरंभ पर्व)** पुण्यातील मावळ विधानसभा मतदारसंघात महायुतीत बंडखोरी झाली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बापू भेगडे यांनी प्रदेश उपाध्यक्ष पदाचा राजीनामा देत अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. तशी माहिती त्यांनी पत्रकार परिषद घेऊन दिली आहे. त्यामुळे मावळ विधानसभा मतदारसंघात आमदार सुनील शेळके विरुद्ध बापू भेगडे अशी लढत पाहायला मिळणार आहे. महायुती मध्ये मावळ विधानसभा मतदारसंघावरून रस्सीखेच सुरु होती. अखेर आज विद्यमान आमदार सुनील शेळके यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांच्याच पक्षातील बापू भेगडे यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट केली आहे.

# एका कचक्यात मोठा गेम होणार?

## मनोज जरांगे आणि संभाजी ब्रिगेडमध्ये काय ठरलं?; अंतरवली सराटीत काय घडतंय?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
विधानसभा निवडणुकीच्या तारखा झाल्यापासून अंतरवली सराटीला अधिक महत्त्व आलं आहे. सर्वच राजकीय पक्षाचे इच्छुक उमेदवार, माजी आमदार आणि विद्यमान आमदारांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेण्यास सुरुवात केली आहे. कोणी मध्यरात्री गुपचूप भेटायला येत आहे, तर कोणी पहाटे पहाटे भेटायला येत आहे. प्रत्येकजण आपली बाजू कशी भक्कम आहे, आपण कसे योग्य उमेदवार आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न करत आहे. संभाजी ब्रिगेडच्या नेत्यांनीही जरांगे यांची भेट घेतली. या बैठकीत नेमकं काय घडलं? दोघे मिळून एकत्र निवडणूक लढणार की अंडरस्टँडिंग ठेवून उमेदवार देणार? याबाबतची माहिती माजी मंत्री बदामराव पंडित यांनी दिली आहे.



बदामराव पंडित यांनी मीडियाशी संवाद साधताना ही माहिती दिली आहे. संभाजी ब्रिगेड हे एक संघटन आणि राजकीय पक्ष आहे. मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश व्हावा तसेच ओबीसींचे संरक्षण व्हावे हे मुद्दे घेऊन संभाजी ब्रिगेड गेल्या अनेक वर्षापासून काम करत आहे. तीच भूमिका जरांगे पाटलांनी घेतली आहे, अशी माहिती बदामराव पंडित यांनी दिली आहे.

विधानसभेत आपली माणसं पाठवायची असेल आणि आपले प्रश्न मार्गी लावायचे असेल तर समविचारी लोकांशी चर्चा करून राजकीय भूमिका घेतली पाहिजे. आपला झेंडा, आपला अजेंडा ही भूमिका पाहिजे. याबाबत पुढे निर्णय होईल आणि त्या अनुषंगाने पुढे वाटचाल चालू होईल, अशी माहितीही बदामराव पंडित यांनी सांगितलं.

जरांगे पाटील आणि आमचा समन्वय चांगला आहे. मात्र या लोकशाहीच्या महोत्सवात आम्ही स्वतंत्र सामील होणार आहोत, असं संभाजी ब्रिगेडने आधीच जाहीर केलं आहे. मनोज जरांगे यांनीही तसंच जाहीर केलं आहे. पण उमेदवार दिल्याशिवाय पर्याय नाही. जी भूमिका जरांगे पाटलांची आहे, तीच भूमिका आमची आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.


विधानसभेत समाजाचे प्रश्न मांडणारे लोक गेले पाहिजे. योग्य उमेदवार देण्याबाबत आम्ही सविस्तर करणार आहोत. जरांगे पाटील यांच्याकडेही आणि आमच्याकडेही उमेदवार येतात. परंतु आम्ही ठरवून उमेदवार देणार आहोत, अशी माहिती त्यांनी दिली.

### मनोज जरांगे- आखरेंची भेट; "चर्चा करून उमेदवार ठरवू"

मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत्या भेटीवर मनोज आखरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. संभाजी ब्रिगेड एक संघटन आणि राजकीय पक्ष आहे. मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश व्हावा. तसंच ओबीसींची संरक्षण व्हावं. हे मुद्दे घेऊन संभाजी ब्रिगेड केल्या अनेक वर्षापासून काम करत आहे. तीच भूमिका जरांगे पाटील यांनीही घेतली आहे, असं मनोज आखरे म्हणाले. समविचारी लोकांशी चर्चा करून पुढील राजकीय भूमिका प्रश्न मार्गी लावायचे असेल तर विधानसभेत आपली माणसं पाहिजेत. आपला झेंडा आपला अजेंडा ही भूमिका पाहिजे. याबाबत पुढे निर्णय होईल आणि त्या अनुषंगाने पुढे वाटचाल चालू होईल, असं त्यांनी म्हटलं. मनोज जरांगे पाटील आणि आमच्या समन्वय चांगला आहे. संभाजी ब्रिगेडने जाहीर केलं आहे की, या लोकशाहीच्या महोत्सवात आम्ही स्वतंत्र सामील होणार आहोत. जरांगे पाटील यांनीही जाहीर केलं आहे की उमेदवार दिल्याशिवाय पर्याय नाही आणि जी भूमिका जरांगे पाटलांची तीच भूमिका आमची आहे. विधानसभेत समाजाचे प्रश्न मांडणारे लोक गेले पाहिजेत. योग्य उमेदवार देण्याबाबत आम्ही पुढे चर्चा सविस्तर करू. जरांगे पाटील यांच्याकडेही आणि आमच्याकडे ही उमेदवार येतात. परंतु आम्ही ठरवून उमेदवार देऊ, असंही मनोज आखरे यांनी यावेळी सांगितलं.

## *अल्पवयीन चालकाच्या मित्राच्या वडिलांनाही अटकपूर्व जामीन नाही*

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
पुणे येथील पोर्शे कार अपघाताशी संबंधित प्रकरणातील अल्पवयीन चालकाच्या मित्राच्या वडिलांना अटकपूर्व जामीन देण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला. मे महिन्यात झालेल्या या अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला होता. पुराव्याचा विचार करता याचिकाकर्त्याने अल्पवयीन मुलाला वाचवण्यासाठी त्याच्या रक्ताचे नमुने बदलल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. शिवाय, त्याला अटकपूर्व जामीन मंजूर केल्यास तो पुरावे नष्ट करू शकतो, असे न्यायमूर्ती मनीष पितळे यांच्या एकलपीठाने याचिकाकर्त्याची अटकपूर्व जामिनासाठी केलेली



याचिका फेटाळताना नमूद केले. अपघात झाला तेव्हा याचिकाकर्त्याचा अल्पवयीन मुलगा कारच्या मागील आसनावर बसला होता. तसेच, अल्पवयीन चालकासह तोही मद्याच्या नशेत होता, असा पोलिसांचा आरोप आहे, पुण्यातील कल्याणीनगर भागात 19 मे रोजी पहाटेच्या सुमारास मोटारसायकलवरून चाललेल्या माहिती-तंत्रज्ञान कंपनीतील दोघा कर्मचाऱ्यांना मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवणाऱ्या अल्पवयीन चालकाने धडक दिली होती. या घटनेनंतर अल्पवयीन चालकाच्या पालकांनी त्याच्याऐवजी त्याच्या आईच्या रक्ताचे नमुने घेण्यासाठी डॉक्टरांना लाच दिली होती. त्याचप्रमाणे, याचिकाकर्त्यानेही ससून रुग्णालयातील डॉक्टरांशी संगनमत करून आपल्या मुलाच्या रक्ताचे नमुने बदलल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. या प्रकरणातील अन्य आरोपींना अटक करण्यात आली असली, तरी याचिकाकर्ता फरार असल्याचे पोलिसांतर्फे न्यायालयाला सांगितले. तसेच, त्याला अटकपूर्व जामीन देण्यास विरोध केला. तर, याचिकाकर्त्यावर पुरावे नष्ट करणे किंवा गुन्हेगाराला पाठिशी घालण्यासाठी खोटी माहिती दिल्याचा आरोप दाखल केला जाऊ शकतो.




# भीमराव तापकीर यांनी विकास कामे केली नाही

## *"...तर आम्ही त्याला ठोकून काढल्याशिवाय सोडणार नाही", मनसे उमेदवार मयुरेश वांजळेंचा इशारा*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल रात्री विधानसभा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. त्यामध्ये हडपसर येथून शहर अध्यक्ष साईनाथ बाबर, कोथरूड येथून किशोर शिंदे आणि मनसेचे आमदार दिवंगत रमेश वांजळे यांचे चिरंजीव मयुरेश वांजळे यांना खडकवासला मतदार संघातून उमेदवारी दिली आहे. शहरातील आठ विधानसभा मतदार संघातून केवळ तीन उमेदवार सध्या तरी जाहीर केले आहेत. येत्या कालावधीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे किती उमेदवार जाहीर करतात हे पाहणे जरूरीचे ठरणार आहे.



मयुरेश वांजळे यांचे वडील रमेश वांजळे हे खडकवासला मतदार संघातून 2009 च्या विधानसभा निवडणुकीत मनसेच्या तिकिटावर प्रचंड मतांनी निवडून आले होते. रमेश वांजळे यांची राज्यभरात 'गोल्डमॅन' म्हणून ओळख होती. त्यांनी मनसे स्टाइलने अनेक आंदोलने केली. तसेच विधिमंडळांमध्ये रमेश वांजळे आणि आमदार आबू आझमी यांच्यातील वाद महाराष्ट्रातील जनतेने पहिला होता. विधिमंडळातील तो प्रसंग कायम चर्चेत राहिला आहे. तर 2011 मध्ये रमेश वांजळे यांचे निधन झाले. त्यानंतर रमेश वांजळे यांची कन्या सायली वांजळे यांनी 2017 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर धायरी भागातून पुणे महापालिकेची निवडणुक लढवली आणि त्या निवडणुकीत विजयी देखील झाल्या.

त्याच दरम्यान मयुरेश वांजळे यांनी खडकवासला मतदार संघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याचे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे इच्छा बोलवून दाखवली. त्यानंतर काल मनसेकडून उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये खडकवासला मतदार संघातून मयुरेश वांजळे यांचे नाव जाहीर करण्यात आले. त्या पार्श्वभूमीवर मयुरेश वांजळे यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की, आमच्या कुटुंबाला अनेक वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय वारसा आहे. आई आणि वडिलांनी खडकवासला भागात मोठ्या प्रमाणावर विकास कामे केली. पण मागील 13 वर्षांच्या कालावधीत खडकवासला विधानसभा मतदार संघातील विद्यमान आमदारांनी (भीमराव तापकीर) कोणत्याही प्रकारची विकास कामे केली नाही. यामुळे हा मतदार संघ अनेक वर्ष मागे राहिला आहे.

याबाबत माझ्या मनात खंत राहिली आहे. यामुळे मी खडकवासला विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवित असून या निवडणुकीत मनसेचा शंभर टक्के झेंडा हा फडकणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

2009 च्या विधानसभा निवडणुकीत रमेश वांजळे हे विजयी झाल्यानंतर विधिमंडळांच्या सभागृहात आमदार आबू आझमी यांच्यातील वाद महाराष्ट्रातील जनतेने पहिला होता. त्या प्रश्नावर ते म्हणाले की, त्यांचा (रमेश वांजळे) जो पॅटर्न होता. तोच आपला पॅटर्न असणार आहे. मराठी माणूस आणि मराठी माणसाच्या अस्मितेकडे कोणी वाकड्या नजरेने बघितले तर आम्ही त्याला ठोकून काढल्याशिवाय सोडणार नाही अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली.





# लाडकी बहीण, महायुतीचे आधार कार्ड...

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी मिळविण्यावरून सर्वच राजकीय पक्षांत संघर्षाला उधाण आले आहे. यावेळी मोठ्या प्रमाणावर बंडखोरी होणार, याची सर्वच पक्षांना जाणीव आहे. विधानसभेत जाण्यासाठी पुढील पाच वर्षे थांबण्याची कोणाची तयारी नाही हे त्यामागचे खरे कारण आहे. बड्या नेत्यांचे सगेसोयरे, कुटुंबीय यांना उमेदवारी दिली जाते म्हणून नाराजी असली तरी त्या कुटुंबाची ताकद मोडून काढणे सोपे नाही हे वरिष्ठांना चांगले ठाऊक आहे. सत्ता मिळविण्यासाठी पक्षाला प्रत्येक आमदाराची गरज आहे. म्हणूनच निवडून येण्याची क्षमता असलेल्या इच्छुकालाच उमेदवारी देण्यात येत आहे. मॅन पॉवर, मनी पॉवर नि मसल पॉवर ज्याकडे हे तीन एम आहेत, त्याला पक्षाची उमेदवारी निश्चित मानली जाते. महाराष्ट्रात विधानसभेच्या 288 जागा आहेत. लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाला मोठा फटका बसला. भाजपा विरोधात मतदान झाले. विधानसभा निवडणुकीत पुन्हा महाआघाडीला यश मिळेल असे सर्वत्र वातावरण बनले. पण हरियाणा विधानसभेचे निकाल आले आणि राज्यात भाजपाला पुन्हा ऊर्जा मिळाली. हरियाणात काँग्रेस सत्तेवर येणार अशी सर्व सर्व्हेंची आकडेवारी सांगत असताना तेथील मतदारांनी पुन्हा भाजपाला सत्तेवर निवडून दिले. हरियाणात भाजपाने विजयाची हॅटट्रीक संपादन केली. लोकसभेत भाजपाला बहुमतापासून मतदारांनी दूर ठेवले तरी भाजपाची लोकप्रियता कमी झालेली नाही, हे हरियाणाच्या मतदारांनी दाखवून दिले.

हरियाणाच्या निकालाने महाआघाडीच्या नेत्यांना महाराष्ट्रात जमिनीवर आणण्याचे काम केले. म्हणूनच विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात नेमके काय होणार हे नामांकित ज्योतिषांना सांगणेही कठीण झाले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात राजकीय स्थिरता असेल काय हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. केंद्रात आपले सरकार आहे म्हणून निकालानंतर आपण कशाही सोंगट्या फिरवू शकतो असे आता भाजपाला करता येणार नाही. सन 2019 ते 2024 या पाच वर्षांत महाराष्ट्रातील राजकीय पक्षांनी अक्षरश: धुडगूस घातला. पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री या राज्याने बघितले. देवेंद्र फडणवीसांचे 80 तासांचे सरकार, नंतर उद्धव ठाकरे यांचे अडीच वर्षांचे आघाडी सरकार व त्यानंतर एकनाथ शिंदे यांचे महायुतीचे सरकार या जनतेने अनुभवले आहे. विशेष म्हणजे कोणीही मुख्यमंत्री असले तरी अजितदादा पवार हे उपमुख्यमंत्री कायम आहेत, हा चमत्कारही याच पाच वर्षांत बघायला मिळाला. सलग पाच वर्षे मुख्यमंत्री राहिलेल्या देवेंद्र फडणवीस यांना एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री राहावे लागले, याची खदखद भाजपामधील त्यांच्या समर्थकांनी अनेकदा बोलून दाखवली. आता देवाभाऊंना भावी मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या समर्थकांनी काही ठिकाणी फलकांवरही झळकवले. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने महाआघाडीला झुकते माप दिले हाच भाजपाचा नि महायुतीचा मोठा पराभव होता. 48 पैकी केवळ 17 मतदारसंघांत महायुतीचे खासदार निवडून आले ही भाजपा-शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यावर मोठी नामुष्की होती. भाजपाच्या



खासदारांची संख्या 21 वरून 9 वर घसरली म्हणून पक्षाने कोणाला जबाबदार धरले नाही याचेच मोठे आश्चर्य वाटते. राज्यात व केंद्रात सत्ता असून आणि उद्धव ठाकरे व शरद पवारांचे पक्ष फोडूनही भाजपाला लाभ मिळवता आला नाही. उलट सत्तेसाठी झालेली तोडफोड मतदारांना पसंत पडली नाही, हाच लोकसभा निकालाचा संदेश होता. राज्यात एकीकडे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यानी कंबर कसली आहे, भाजपाला निवडणुकीत धडा शिकविण्याची ते भाषा बोलत आहेत. विशेष म्हणजे आंदोलकांचे नेते शरद पवार, एकनाथ शिंदे किंवा अजितदादा पवार या दिग्गज मराठा नेत्यांवर एका शब्दाने टीका करीत नाहीत. त्यांचे निवडणुकीतील टार्गेट हे देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे उमेदवार आहेत. मराठा समाजाला शिंदे सरकारने दहा टक्के आरक्षण देऊनही आंदोलक नेत्यांचे समाधान झालेले नाही. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळाले पाहिजे, हा हट्ट त्यांचा कायम आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्यावे या मागणीपासूनही ते माघार घेण्यास तयार नाहीत. जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी आजवर सहा उपोषणे केली. त्यांच्या पाठीशी विशेषत: मराठवाड्यात मराठा समाज एकवटला आहे, हेच दृश्य वेळोवेळी बघायला मिळाले. मराठा समाजाची नाराजी नुकसानकारक ठरू नये यासाठी भाजपाला विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. हरियाणात जाट समाज काँग्रेसच्या पाठीशी एकवटला असल्याचे चित्र होते, तेव्हा भाजपाने बिगर जाट समाजाची मोट बांधून मोठी व्होट बँक उभी केली. तसेच महाराष्ट्रात बिगर मराठा समाजांना एकत्र आणणे ही भाजपाची मोठी कसोटी ठरणार आहे. धनगर समाजाला अपेक्षित आरक्षण मिळाले नाही म्हणून धुसफूस आहेच. शिवाय प्रहार संघटनेचे बच्चू कडू, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, छत्रपती संभाजी राजेंची स्वराज संघटना, अशी तिसरी आघाडी मैदानात उतरली आहे. राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वबळावर रणसंग्रामात उतरली आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकमध्ये महायुतीला किंवा महाआघाडीला मनसेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याशिवाय प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी मते खेचणारच आहे. महायुतीत असूनही रामदास आठवले यांच्या पदरात काही भरीव पडलेले दिसत नाही. महाआघाडी व महायुती यामधील सहा राजकीय पक्षांची उमेदवारी ज्यांना मिळणार नाही, ते आपली ताकद या निवडणुकीत दाखवणार हे निश्चित आहे. आघाडी व युतीला त्यांच्याच पक्षातील बंडोबांशी मोठा सामना करावा लागणार आहे. हरियाणात एका काँग्रेस नेत्याच्या अहंकार व एकाधिकारशाहीपुढे पक्षात अन्य कोणाला विश्वासात घेतले गेले नव्हते, तशा चुका महाराष्ट्रात होऊ नयेत, दक्षता घेणे हे काँग्रेसचे हायकमांडचे काम आहे. हरियाणात भूपेंदिर सिंह हुड्डा यांच्या फाजिल आत्मविश्वासामुळे विजयाच्या टप्प्यात आलेली निवडणूक काँग्रेसला पराभवाकडे घेऊन गेली तसा फटका महाराष्ट्रात नाना पटोलेंच्या स्वभावमुळे बसू नये असे आघाडीतील नेत्यांनी बोलून दाखवले आहे. राज्यात भाजपा म्हणजे देवेंद्र फडणवीस हेच आहेत. देवेंद्र हाच भाजपाचा महाराष्ट्रातील चेहरा आहे. मोदी, शहा किंवा नड्डा यांचा सर्वाधिक विश्वास फडणवीसांवर आहे. भाजपाच्या जाहीर झालेल्या पहिल्या यादीत पहिले नाव देवेंद्र फडणवीस यांचे होते ही त्याची झलक आहे. चंद्रशेखर बावनकुळे हे प्रदेशाध्यक्ष असले तरी पक्षाचे केंद्रस्थान मुंबईतील मलबार हिलवरील सागर बंगला हाच आहे. एकनाथ शिंदे यांची ठाकरेंच्या शिवसेनेत नंबर 2 अशी कधीच ओळख नव्हती. आता ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत तसेच महायुतीचे नंबर 1 चे नेते आहेत. महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण हे जरी जाहीर झाले नसले तरी महायुती ही एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुकीला सामोरे जात आहे हे भाजपाने सुद्धा मान्य केले आहे.


एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंच्या शिवसेनेत चाळीस आमदारांसह बंड करण्याची जी हिम्मत दाखवली त्याला तोड नव्हती. त्यांच्या बंडाने शिवसेनाप्रमुखांच्या पुत्राला, उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागले. भाजपाच्या आशीर्वादाने व संरक्षक कवचाने एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राच्या सर्वोच्च सिंहासनावर बसले असले तरी संपूर्ण महाराष्ट्रात अल्पावधीत जनतेचा नेता अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे. रोज 18 तास काम करणाऱ्या या नेत्याकडे दूरदृष्टी आहे. कामाचा झपाटा आहे. कमी वेळात विकासाची कामे मार्गी लावण्याचे कौशल्य आहे आणि उद्योग व्यवसायात प्रचंड गुंतवणूक त्यांनी महाराष्ट्रात आणली आहे. एवढी ऊर्जा, उत्साह, कार्यक्षमता, तप्तरता त्यांच्याकडे येते कोठून? भाजपापेक्षा कोणत्या नेत्यापेक्षा आपण सरस आहोत हे त्यांनी आपल्या कामांनी सिद्ध करून दाखवले आहे. म्हणूनच मोदी-शहांचा थेट विश्वास संपादन करण्यात ते यशस्वी झाले आहेत. कार्यकर्ते संभाळणारा, लोकप्रतिनिधींची कामे विनाविलंब करणारा हा नेता आहे. शहरी व ग्रामीण भागातील जनतेला आपला नेता मुख्यमंत्रीपदावर आहे, असे वाटते, हीच त्यांच्या कामाची पावती आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही तर गेम चेंजर ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीचे झालेले नुकसान लाडकी बहीण भरून काढणार आहे. या योजनेमुळे दोन कोटी तीस लाख बहिणींची व्होट बँक एकनाथ शिंदे यांनी आपलीशी केली आहे. लाडकी बहीण योजनेने महाआघाडीला धडकी भरली आहे. आपण लाडक्या बहिणींना दरमहा तीन हजार रुपये देऊ, या आश्वासनाने बहिणी सुखावल्या आहेत. ही योजना बंद होणार नाही, हा फार मोठा दिलासा एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. लाडकी बहीण योजनेच्या श्रेयवादावरून महायुतीत चढाओढ असली तरी हीच योजना हे महायुतीचे आधार कार्ड ठरणार आहे.

# केवळ 7% मुलींना मृत्युपत्राद्वारे समान वारसाहक्क मिळतो

*सनफिस्ट मॉम्स मॅजिक आपल्या 'विल ऑफ चेंज' या उपक्रमाद्वारे देशभरातील मातांना हे बदलण्यासाठी प्रेरित करतो*

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारतात मुलींना पुत्रांप्रमाणेच कौटुंबिक संपत्तीत समान अधिकार असला तरी प्रत्यक्षात तसे दिसून येत नाही. सनफिस्ट मॉम्स मॅजिकने केलेल्या संशोधनातून असे दिसून आले आहे की, केवळ 7% मुलींना मृत्युपत्राद्वारे समान वारसा मिळतो. "बेटियां पराया धन होती हैं" (मुली या शेवटी दुसऱ्याची जबाबदारी असते) हा जुना समज अजूनही भारतीय कुटुंबांमध्ये प्रचलित आहे. अली हॅरिस शेरे, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर, बिस्किट्स आणि केक्स क्लस्टर, फूड्स डिव्हिजन, आयटीसी लिमिटेड यांनी या मोहिमेचे महत्त्व पटवून देताना सांगितले की, "भारतात अशा अनेक माता आहेत ज्यांना वारसाहक्काच्या



बाबतीत त्यांच्या पालकांकडून अन्यायकारक वागणूक सहन करावी लागली आहे. परंतु आता त्याच माता त्यांच्या मुलींसाठी त्यांच्या कुटुंबात खऱ्या अर्थाने बदल घडवून आणू शकतात. 'विल ऑफ चेंज' मोहिमेद्वारे, आम्हाला मुलींना समान वारसा हक्क मिळवून देण्यासाठी आणि परिवर्तनाची माता (#MomOfChange) बनण्यासाठी मातांना प्रेरित करायचे आहे." कालांतराने, भारतातील मातांनी त्यांच्याशी संबंधित विविध मुद्द्यांवर आवाज उठवला आणि आपली मते ठामपणे मांडली आहे. मातांना प्रभावित करणाऱ्या समस्या मांडण्यासाठी ओळखला जाणारा ब्रँड, आईटीसी सनफिस्ट मॉम्स मॅजिक, त्यांच्या पूर्वीच्या मोहिमांमधून त्यांना प्रेरणा देत आहे. समानतेच्या दिशेने बदल घडवून आणण्यास समर्थन देत, ब्रँडचा नवीनतम उपक्रम 'विल ऑफ चेंज' हा समाजातील खोलवर रुजलेल्या पक्षपातावर प्रकाश टाकतो, ज्यामध्ये वारसाहक्काच्या बाबतीत मुलींना दुर्लक्षित केले जाते. ही मोहीम मातांना, परिवर्तनाचे आधारस्तंभ म्हणून, या महत्त्वपूर्ण मोहिमेचे नेतृत्व करण्याचे आणि #MomOfChange बनण्यासाठी त्यांना सक्षम करण्याचे आवाहन करते. एक ब्रँड म्हणून, सनफिस्ट मॉम्स मॅजिकचा विश्वास आहे की आई ही सर्वात मोठी शक्ती आहे आणि ती तिच्या मुलांच्या मार्गात येणाऱ्या जगातील पक्षपाताशी लढू शकते. 'विल ऑफ चेंज' उपक्रमासह, हा ब्रँड समाजातील सर्वात प्रचलित असलेल्या पक्षपाताचा सामना करतो आणि या परिवर्तनाची जबाबदारी घेण्यासाठी मातांना प्रेरित करतो.

या मोहिमेमध्ये शेफाली शाह आणि मनीष चौधरी अभिनीत एक अतिशय भावनिक आणि विचार करायला लावणाऱ्या चित्रपटाचा उल्लेख केला आहे. मुलींनी कुटुंबासाठी कितीही योगदान दिले तरीही, वारसाहक्काचे निर्णय कसे त्यांना दुर्लक्षित करतात हे या चित्रपटात दाखवण्यात आले आहे. ही कथा एका आधुनिक कौटुंबिक पार्श्वभूमीवर आधारित आहे, ज्यामध्ये श्री शेखर वर्मा एका वकिलासोबत त्यांचे मृत्यूपत्र तयार करत आहेत.

जेव्हा त्यांची मुलगी श्रेया त्यांना कागदपत्रे जमवण्यास मदत करते, तेव्हा हे स्पष्ट होते की फक्त त्यांचा मुलगा अर्जुन यालाच त्यांच्या कौटुंबिक संपत्तीचा वारस बनवले जात आहे. आईची भूमिका साकारलेल्या शेफाली शाह, या निर्णयाला शांतपणे पण सामर्थ्याने आव्हान देते आणि आपल्या पतीला आठवण करून देते की, रोजच्या जीवनात आपण आपल्या मुलीला नेहमीच "बेटा" (मुलगा) मानतो, परंतु जेव्हा वारसाहक्काचा प्रश्न येतो तेव्हा ती "बेटी" (मुलगी) बनते. तिच्या या शब्दांचा तिच्या पतीवर खोलवर परिणाम होतो आणि ती त्याला त्याच्या पक्षपाती निर्णयाचा पुन्हा विचार करण्यास प्रोत्साहित करते. अधिक माहितीसाठी आणि परिर्वतनाचा भाग होण्यासाठी, WillofChange.com ला भेट द्या आणि आजच तुमचा पाठिंबा देण्याचे वचन द्या.

# सांस्कृतिक वारसा जश्न-ए-अदब हा साहित्य संमेलन पुण्यात रंगणार!

- दोन दिवसीय कार्यक्रम 26 आणि 27 ऑक्टोबर 2024 रोजी आयोजित केला जाईल.
- हा महोत्सव भारतीय कला, संस्कृती आणि साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी समर्पित असेल.
- भारतभरातील प्रसिद्ध कलाकार साहित्योत्सव जश्न-ए-अदब सांस्कृतिक कारवाँ वारसा पाहतील.




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वात लोकप्रिय साहित्य महोत्सव आणि साहित्य आणि संगीताचा महाकुंभ 'जश्न-ए-अदब सांस्कृतिक कारवां विरासत' पुणे शहरात सुरु होत आहे. हा दोन दिवसीय महाकुंभ 26 आणि 27 ऑक्टोबर 2024 रोजी नॅशनल फिल्म आर्काइव्ह ऑफ इंडिया (NFAI) सभागृह, NFDC, लॉ कॉलेज रोड येथे आयोजित केला जाणार आहे. भारतीय संस्कृती, कला आणि साहित्याचा उत्सव साजरा करण्यासाठी समर्पित साहित्य उत्सव हा कार्यक्रम शास्त्रीय गायन, गझल गायन, पॅनेल डिस्कशन, नाटक, मुशायरा आणि कवी संमेलन, वाद्य वादन, शास्त्रीय नृत्य आणि लोकगायन इत्यादी उपक्रमांनी भरभराटीला येणार आहे. कार्यक्रमासाठी प्रवेश पूर्णपणे विनामूल्य आहे आणि www.jashneadab.org या लिंकवर स्वतःची नोंदणी करून उपस्थित राहता येईल. या भव्य सोहळ्याबद्दल उत्साह व्यक्त करताना, साहित्योत्सव जश्न-ए-आदबचे संस्थापक, कुंवर रणजीत चौहान म्हणाले, "साहित्योत्सव 'जश्न-ए-आदब' सांस्कृतिक कारवां विरासत 2024 हा संपूर्णपणे भारतीय कला, संस्कृती आणि साहित्याचा उत्साही उत्सव आहे भारतीय संस्कृतीच्या वैविध्य आणि समृद्धतेचा आदर करत, देशाच्या कानाकोपऱ्यात भारतीय कला, साहित्य आणि नृत्याचा अनमोल वारसा लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे नव्या पिढीच्या मनात आपल्या सांस्कृतिक परंपरेबद्दल आदर निर्माण व्हावा, अशा वेळी आम्ही सर्व शहरवासीयांना विनंती करतो की त्यांनी जास्तीत जास्त संख्येने साहित्य संमेलनात सहभागी व्हावे आणि हा अनोखा सोहळा आणखी विशेष आणि संस्मरणीय बनवावा."

> भारतीय संस्कृती आणि साहित्याला प्रोत्साहन देणे आणि युवा पिढीला त्याचे महत्त्व पटवून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे, हे विशेष. या दोन दिवसीय महोत्सवात आयोजित केलेले विविध सांस्कृतिक आणि साहित्यिक उपक्रम पुण्यातील रहिवासी आणि पाहुण्यांना एक अनोखा अनुभव देणार आहेत. देशभरातील सर्व साहित्य आणि संस्कृती प्रेमी या महोत्सवात सहभागी होऊ शकतात आणि या अनोख्या प्रवासाचा सर्वात महत्त्वाचा भाग बनू शकतात.

प्रख्यात बासरीवादक आणि संगीत दिग्दर्शक, पद्मविभूषण पं. हरिप्रसाद चौरसिया आणि प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय गायक, पद्मभूषण पं. साजन मिश्रा यांच्या उपस्थितीत शनिवार, 26 ऑक्टोबर रोजी पहिल्या दिवसाची सुरुवात होईल. याशिवाय अनेक नामवंत कलाकार आणि साहित्यिकही या महोत्सवात सहभागी होणार आहेत. यानंतर मराठी कवी संमेलनात मराठी भाषेतील कवी आपल्या कलाकृतींमधून श्रोत्यांना भाषेचा गोडवा आणि खोली अनुभवायला मिळतील. यानंतर 'अज्ञात ते ज्ञातापर्यंत...' या सत्रात प्रसिद्ध अभिनेते, चित्रकार, लेखक आणि दिग्दर्शक पंकज झा आपल्या कवितांमधून जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श करून रसिकांना मंत्रमुग्ध करतील. 'द स्वर्लिंग वर्ल्ड ऑफ थिएटर' या सत्रात पंकज झा आणि प्रसिद्ध अभिनेते सुमीत व्यास कुंवर रणजीत चौहान यांच्याशी संवाद साधतील आणि थिएटरच्या जगाच्या विविध पैलूंवर चर्चा करतील. 'मृतांच्या स्मरणार्थ' तारीकी हमीद यांचे कॉमेडी स्किट सादर केले जाणार आहे, जे प्रेक्षकांना हसायला लावेल. यानंतर 'सूर-साधना'मधील पद्मभूषण पं. साजन मिश्रा यांचे सुश्राव्य सादरीकरण श्रोत्यांना शास्त्रीय संगीताच्या अप्रतिम प्रवासात घेऊन जाईल. पद्मविभूषण पं. हरिप्रसाद चौरसिया यांच्या मधुर बासरीवादनाने कार्यक्रमाची सांगता होईल.

कार्यक्रमाचा दुसरा दिवस रविवार 27 ऑक्टोबर रोजी होणार आहे. पहिले सादरीकरण 'मुशायरा-नौ बहार' हे असेल, ज्यामध्ये दखत रावल मिजाझ, जव्वाद सय्यद फैसल खान, अदनान शेख, शोएब फिरोजी आणि पूनम खत्री आपल्या कवितांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतील. यानंतर, 'अपनी कहानी के अपनी किरादार' सत्रात, प्रसिद्ध अभिनेते आणि लेखक मनु ऋषी चड्ढा त्यांच्या कथा वाचतील, ज्याच्याशी सर्व श्रोते स्वतःला जोडलेले असतील. कथ्थक तज्ञ ऋचा जैन 'कथा-कथक'मध्ये कथ्थक नृत्य सादर करणार असून, त्यात कथा आणि नृत्याचा अप्रतिम संगम पाहायला मिळणार आहे. 'OTT - सिनेमा आणि थिएटर- बदलते पर्यावरण' या सत्रात मनू ऋषी चड्ढा, प्रसिद्ध अभिनेता चंदन रॉय सन्याल, कुंवर रणजीत चौहान यांच्यासोबत ओटीटी, सिनेमा आणि थिएटरच्या बदलत्या वातावरणावर चर्चा करेल. 'सुखन बहार- मुशायरा'मध्ये फरहत एहसास, शमीम अब्बास, मदन मोहन दानिश, कर्नल गौतम राजऋषी, कुंवर रणजीत चौहान, जावेद मुशिरी, शाकीर देहलवी आणि अनस फैजी आपल्या कवितांनी संध्याकाळ उजळून टाकतील. समारोप समारंभानंतर राजा सरफराज दरबारी अँड ग्रुप 'मेहफिल-ए-कव्वाली' सादर करतील.

## थोडक्यात



### आमदार अशोक पवार आज भरणार उमेदवारी अर्ज

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही मात्र इकडे शिरूर हवेलीत आमदार अशोक पवारांचं ठरलंय अशोक पवार गुरुवार दि.24 ऑक्टोबर रोजी शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरजचंद्र पवार पक्षाकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. उद्योजक प्रकाश धारिवाल, खासदार सुप्रिया सुळे, खासदार अमोल कोल्हे, खासदार निलेश लंके यांच्या उपस्थित महाविकास आघाडीच्या शेकडो कार्यकर्त्यांसह शक्ती प्रदर्शन करत पवार आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.



### 'सॅटरडे नाईट'च्या चित्रीकरणाचा शुभारंभ

**पुणे (आरंभ पर्व) :** अध्यांश मोशन पिक्चर्स प्रस्तुत 'सॅटरडे नाईट' या चित्रपटाचा मुहूर्त सोहळा नुकताच संपन्न झाला. विलास वाघमोडे आणि अनुप्रिता कडू - गंगावणे दिग्दर्शित या चित्रपटाचे प्रणाली उन्मेश वाघमोडे आणि उन्मेश विलास वाघमोडे निर्माते आहेत. या थरारक चित्रपटात शशांक शेंडे, अक्षया गुरव, पुष्कराज चिरपुटकर, आस्ताद काळे, वर्षा दांदळे, कृतिका तुळसकर, सानिका बनारसवाले आणि जितेंद्र पोळ यांच्या प्रमुख भूमिका आहेत. डॉ. सुधीर निकम यांची कथा आणि पटकथा असलेल्या या चित्रपटाचे संवाद विलास वाघमोडे आणि डॉ सुधीर निकम ह्यांचे असून रविंद्र सिद्धू गावडे एक्झिक्युटिव्ह प्रोड्युसर आहेत. तर धनाजी यमकर क्रिएटिव्ह प्रोड्यूसर आहेत. छायाचित्रणाची धुरा निशांत भागवत याने सांभाळली असून लवकरच या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखही जाहीर होणार आहे. 'सॅटरडे नाईट' हा स्त्री भ्रूण हत्येवर आधारित थ्रिलर चित्रपट असून प्रेक्षकांना एक वेगळा थरार यानिमित्ताने अनुभवायला मिळणार आहे. 'सॅटरडे नाईट' विषयी बोलताना दिग्दर्शक विलास वाघमोडे म्हणतात, "हा चित्रपट फक्त गुन्हेगारी तपासावर आधारित नाही, तर मानवी स्वभावाच्या गूढ कोपऱ्यांवर प्रकाश टाकतो.

## आवडीचे खाणे आणि विकासावर बोलणे

# काकासाहेब चव्हाण यांचा उपक्रम ठरतोय सरस





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील प्रबळ दावेदार असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्ष खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण यांनी एक अभिनव उपक्रम राबवला आहे. त्याची सर्वत्र चर्चा आहे. आवडीचे खाणे आणि विकासावर बोलणे हा अभिनव उपक्रम खडकवासला मतदारसंघांमध्ये चांगलाच गाजतो आहे.

खडकवासला विधानसभा मतदारसंघाची नुकतीच निवडणूक लागली आहे. मात्र या निवडणुकीच्या अगोदर पासूनच राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण यांनी जोरदार तयारी केली आहे.

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील महत्त्वाचे प्रश्न जाणून घेण्यासाठी त्यांनी अभिनव संकल्पना राबवली आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघातील विविध भागातील रेस्टॉरंटमध्ये भागातील नागरिकांची बैठक घेऊन खाद्यपदार्थांचा स्वाद घेत ,अडीअडचणी जाणून घेण्याचा व समस्यां निवारणाचा त्यांचा प्रयत्न आहे. यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतोय. आतापर्यंत आपण चाय पे चर्चा, कॉर्नर सभा, वगैरे उपक्रम बघितले आहेत. मात्र या उपक्रमांनी इतर इच्छुका समोरही त्यांनी एक आदर्श ठेवला आहे.

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत खडकवासला विधानसभेसाठी काकासाहेब चव्हाण यांना शुभेच्छा दिल्या आहेत. असा कार्य तत्पर नेता विधानसभेचा आमदार व्हावा अशी इच्छा नागरिक बोलून दाखवत आहेत.

### काकांचा प्रचाराचा एक टप्पा पूर्ण

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण यांनी अगोदरच विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा एक टप्पा पूर्ण केला आहे. मागील तीन ते चार महिन्यापासून ते मतदारसंघातील प्रत्येक भागात जाऊन ते समस्या जाणून नागरिकांशी संवाद साधत आहेत.शिवाय त्यांचे सर्व कुटुंबीय हे ही सक्रिय होत मतदारांशी गाठीभेटी घेत आहेत.त्यामुळे काकासाहेब चव्हाण यांची विधानसभेच्या दृष्टीने पूर्ण तयारी झाली आहे.शिवाय काकासाहेब चव्हाण यांची सोशल मीडिया टीम खडकवासला मतदारसंघांमध्ये एक प्रभावी टीम म्हणून पुढे आली आहे. त्याची सर्वत्र चर्चा आहे. उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर आणखी वेगाने व ताकदीने पूर्ण मतदारसंघांमध्ये काका चव्हाण संवाद सुरू ठेवून विधानसभेमध्ये जाण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.

## थोडक्यात




### मुलींपासून चार हात लांब राहणाऱ्या तरुणाची मनमौजी गोष्ट

**पुणे (आरंभ पर्व) :** मुलगी किंवा बायका न आवडणाऱ्या तरुणाच्या आयुष्यात एक नाही, तर चक्क दोन तरुणी येतात आणि त्या तरुणाचं काय होतं याची धमाल, मनोरंजक गोष्ट 'मनमौजी' या चित्रपटातून उलगडणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च नुकताच करण्यात आला असून, आतापर्यंत पोस्टर आणि टीजरमध्ये दिसलेल्या फ्रेशनेसमुळे चित्रपटाविषयी आधीच असलेलं कुतुहल आता आणखी वाढलं आहे. उत्तम स्टारकास्ट असलेला "मनमौजी" हा चित्रपट 8 नोव्हेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. गुलाबजाम, लॉस्ट अँड फाऊंड अशा चित्रपटांची निर्मिती केलेल्या गोल्डन गेट मोशन पिक्चर्सच्या विनोद मलगेवार यांनी "मनमौजी" चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन शीतल शेट्टी यांचे असून हृषिकेश जोशी यांनी संवाद लेखन केले आहे. प्रसाद भेंडे यांनी कॅमेरामन म्हणून काम पाहिले आहे. क्षितिज पटवर्धन आणि वलय मुळगुंद यांनी गीतलेखन, अमितराज आणि पंकज पडघन यांनी संगीत दिग्दर्शन केलं आहे. चित्रपटात अभिनेता भूषण पाटील अभिनेत्री सायली संजीव, सिनेसृष्टीत प्रथमच पदार्पण करणारी रिया नलावडे, जयवंत वाडकर, अरुण नलावडे, भाऊ कदम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. फिल्मास्त्र स्टुडिओज ह्या चित्रपटाचे वितरक म्हणून काम पाहणार आहेत तर कार्यकारी निर्माता म्हणून संदीप काळे यांनी काम पाहिले आहे. मुलींपासून चार हात लांब राहणाऱ्या तरुणाच्या आयुष्यात दोन तरुणी येतात, त्यानंतर या तरुणाचे मुलींविषयीचे विचार बदलतात का? त्याचं प्रेम जडतं का? अशा आशयसूत्रावर "मनमौजी" हा चित्रपट बेतला आहे. प्रेमकथेशिवाय कथेला अनेक भावनिक पदर असल्याचंही आपल्या ट्रेलरमधून पाहायला मिळतं. उत्तम कलाकार, रंजक गोष्ट, नेत्रसुखद लोकेशन्स, श्रवणीय संगीत याचा मिलाफ "मनमौजी" चित्रपटातून नक्कीच अनुभवायला मिळणार आहे. चित्रपटाचा ट्रेलर निश्चितच प्रॉमिसिंग आहे. म्हणून "मनमौजी" अनुभव घेण्यासाठी आता 8 नोव्हेंबरला चित्रपटगृहात जावंच लागणार यात शंका नाही.

### सोने खरेदीचा कल प्रबळ : डॉ. सौरभ गाडगीळ



**पुणे (आरंभ पर्व) :** जागतिक पातळीवर भू-राजकीय परिस्थितीमुळे किंमतींमध्ये जरी चढ-उतार होत असले तरी भारतात सोने खरेदीचा कल प्रबळ आहे. सोन्याला एक सुरक्षित गुंतवणूक म्हणून बघितले जात असून जरी खरेदीचे प्रमाण गेल्या वर्षीप्रमाणेच अपेक्षित असले तरी धनत्रयोदशीला सोन्याच्या मूल्याचा विचार करता 15 ते 20 टक्के वाढ अपेक्षित आहे. किंमतींमध्ये चढ-उतार होत असताना विक्रीमध्ये तात्पुरती घट झाली असली तरी रिटेलच्या माध्यमातून नवीन बाजारपेठ आणि ग्राहक वर्गांपर्यंत पोहचून ही दरी भरून काढता येईल.

## पोलिओमुक्त भविष्य निर्माण करण्यात लसीकरणाची भूमिका महत्त्वाची : डॉ. महेश सुलक्षणे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

24 ऑक्टोंबर या जागतिक पोलिओ दिनानिमित्त, पोलिओमायलिटिसमुळे निर्माण होणारा सततचा धोका ओळखणे आवश्यक बनले आहे. मेघालयात पोलिओचा नवा रुग्ण सापडल्यामुळे नवी चिंता निर्माण झाली आहे. पोलिओचे सूक्ष्म विषाणू असतात. ते अन्न पाण्यामार्फत तोंडावाटे शरीरात येतात. दूषित पाणी हेच त्यांचे मुख्य वाहन आहे. यात हे विषाणू 6 महिनेपर्यंत जिवंत राहू शकतात. विष्ठेमार्फत हे विषाणू पाणी, जमीन वगैरेमध्ये पसरतात. याचा सर्वाधिक फटका पाच वर्षाखालील मुलांना प्रभावित करतो, ज्यामुळे पक्षाघात होतो आणि काही प्रकरणांमध्ये मृत्यूही होतो. अनेक दशकांची प्रगती असूनही, हा आजार विशेषत: भारतासारख्या देशांसाठी पोलिओमुक्त असतानाही जागतिक आरोग्या धोका म्हणून राहिला आहे. त्यामुळे पोलिओ पुन्हा पसरू यासाठी सतर्क राहणे आवश्यक आहे. डॉ सुलक्षणे मल्टिस्पेशालिटी क्लिनिक, पुणे येथील सल्लागार बालरोगतज्ञ आणि निओनॅटोलॉजिस्ट डॉ. महेश सुलक्षणे म्हणाले की इनएक्टिव्हेटेड पोलिओ लस (आयपीव्ही) जीवनासाठी पक्षाघात होऊ शकणाऱ्या विषाणूपासून आवश्यक संरक्षण देते. 6 आठवड्यांपासून लसीकरण केल्याने मुलांना रोगप्रतिकारक शक्तीची उत्तम संधी मिळते. भारताचा 12 वर्षांचा पोलिओमुक्त दर्जा हा व्यापक लसीकरण मोहिमांचा परिणाम आहे. डब्ल्यूएचओच्या मते, भारतात पोलिओ लसीचे जवळपास 1 अब्ज डोस दरवर्षी दिले जात होते, जे निर्मूलनापर्यंत नेणाऱ्या अंतिम वर्षांमध्ये 172 दशलक्ष मुलांपर्यंत पोहोचले. तरीही, जगाच्या इतर भागांमध्ये अलीकडील उद्रेक जागृत राहण्याच्या गरजेची स्पष्ट आठवण करून देतात

डॉ. सुलक्षणे म्हणाले की, भारत पोलिओमुक्त होऊन एका दशकाहून अधिक काळ लोटला आहे, तरीही जगाच्या काही भागांमध्ये हा विषाणू अस्तित्वात आहे. विशेषत: जागतिक चळवळीसह भारतात पुन्हा प्रवेश करण्याची शक्यता कायम चिंतेची बाब आहे." लस आणि लसीकरण पद्धती (आयएपी एसीव्हीआयपी) वरील भारतीय बालरोग सल्लागार समिती शिफारस केलेल्या लसीकरण वेळापत्रकाचे बारकाईने पालन करण्याच्या गरजेवर भर देते. यामध्ये जन्माच्या वेळी, 6, 10 आणि 14 आठवड्याच्या वेळी पोलिओ लस (ओपीव्ही) द्यावी तसेच 16-18 महिन्यांत आणि पुन्हा 4-6 वर्षांनी बूस्टर डोस देणे समाविष्ट आहे. या शेड्यूलचे पालन करणे वैयक्तिक आणि सामूहिक प्रतिकारशक्ती राखण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. भारताची लोकसंख्या आणि कमी जागेत जास्त लोक राहत असल्यामुळे पोलिओचा धोका टाळणे अत्यंत गरजेचे आहे.

डॉ. सुलक्षणे पुढे म्हणाले की, "उच्च लसीकरण दरामुळे पोलिओ दूर राहण्याची खात्री होते. त्याशिवाय, नवीन पोलीस सापडण्याच्या धोक्यामुळे आम्ही साध्य केलेली उल्लेखनीय प्रगती कमी होण्याचा धोका आहे.



जागतिक पोलिओ दिनी, संदेश स्पष्ट आहे: पोलिओ प्रसार रोखण्यासाठी लसीकरण ही गुरुकिल्ली आहे. उच्च लसीकरण दर राखून आणि सार्वजनिक आरोग्य उपक्रमांना पाठिंबा देऊन, भारत पोलिओविरुद्धचा लढा सुरू ठेवू शकतो आणि भविष्यातील पिढ्यांचे या प्रतिबंधित रोगापासून संरक्षण करू शकतो. जागतिक उद्दिष्ट आवाक्यात आहे, परंतु केवळ भारतासह प्रत्येक राष्ट्राने पोलिओ निर्मूलनासाठी आपल्या वचनबद्धतेवर स्थिर राहिल्यासच हे शक्य होऊ शकते. अस्वीकरण: "सनोफी आणि डॉ रेड्डीज लॅबोरेटरीज लिमिटेड द्वारे समर्थित सार्वजनिक कल्याणकारी उपक्रम. कृपया वैद्यकीय सल्ल्यासाठी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या".

## फायरफ्लाय फायर पंप्सने भारतातील पहिले स्वदेशी CAFS तंत्रज्ञानाचे अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फायरफ्लाय फायर पंप्स, भारतातील अग्निशामक उपकरणांचा एक नेता, दिल्लीतील नुकत्याच संपन्न झालेल्या फायर इंडिया 2024 एक्स्पोमध्ये देशातील पहिल्या स्वदेशी संकुचित वायू फोम प्रणाली – Compressed Air Foam System (CAFS) चे अनावरण करण्याची गर्वाने घोषणा करते. ही नवीन तंत्रज्ञान अग्निशामक क्षमतांना वाढवते कारण ती एक हलका फोम तयार करते जो अग्निशामक प्रभावीपणे कमी करताना पाण्याचा वापर कमी करतो. संकुचित वायू फोम प्रणाली (CAFS) अग्निशामक प्रभावीपणाला वाढवते कारण ती Compressed Air (संकुचित वायूचा) वापर करून हलका, अधिक कार्यक्षम फोम तयार करते. हा फोम विस्तारतो आणि पृष्ठभागावर चिकटतो, ज्यामुळे त्याची आग नियंत्रणाची गुणधर्म सुधारते. CAFS एक संरक्षणात्मक थर्मल अडथळा तयार करते, ज्वलनशील सामग्रीचे संरक्षण करते आणि आग लागण्यापासून प्रतिबंध करते. त्यातील जलविषयक सामग्री आगची उष्णता शोषते, आणि फोम आगीला ऑक्सिजनपासून वेगळे करून आग शमवतो, जे आग नियंत्रणात महत्त्वाचे आहे.




CAFS तंत्रज्ञानाच्या लॉन्चवर, फायरफ्लायचे संशोधन व विकास संचालक, दर्शन माळी म्हणाले, "फायरफ्लाय फायर पंप्सने भारतात अग्निशामक तंत्रज्ञानाच्या प्रगतीत आघाडी घेतल्याबद्दल आम्हाला अभिमान आहे. आमचे CAFS तंत्रज्ञान अग्निशामक प्रयत्नांची प्रभावीता वाढवते आणि जलद, कार्यक्षम प्रतिसाद सुनिश्चित करते. पृष्ठभागावर चिकटणारा फोम तयार करून आणि संरक्षणात्मक अडथळा तयार करून, आम्ही अग्निशामकांना अत्यंत आव्हानात्मक वातावरणात जीव आणि संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक साधने प्रदान करत आहोत. नाविन्याच्या प्रति आमची वचनबद्धता अशीच चालू राहील, आणि आमची CAFS प्रणाली त्याचे प्रमाण आहे." मुंबई च्या एका उत्पादन प्रात्यक्षिका मध्ये, Firefly च्या CAFS नी ऊंच इमारतींच्या 150 मीटर वरची आग विझवण्यामध्ये यश मिळवलेला आहे.

## सायकल प्युअर अगरबत्तीची नवीन बहारदार उत्पादने सादर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील उदबत्तींचे अग्रगण्य उत्पादक सायकल प्युअर अगरबत्ती आध्यात्मिक प्रथा आणि कल्याणाला उन्नत करण्यासाठीच्या आपल्या नवीनतम उत्पादनांच्या श्रेणीसह दिवाळी मोसमात रौनक आणत आहेत. यंदाच्या दिवाळीत ब्रँडकडून नवीनतम उत्पादनासह घरात शांती आणि उत्पादकता यांचे स्वागत करा. यात गुलाब, चंदन आणि मोगरा यांच्या सुगंधाचे आकर्षण असलेल्या हेरिटेज धूप शक्ती कलेक्शन, नैवेद्य सांबरानी गोल्ड सीरीज कलेक्शन आणि एअरकर्पूर वेलबींग कलेक्शन यांचा समावेश आहे. प्रार्थना आणि भक्ती यांचे वातावरण घेऊन प्रकाशाचे हे पर्व साजरे करा तसेच प्रयोजनासाठी विशेष अनुभव निर्माण करा. यात हेरिटेज धूप शक्ती कलेक्शन हे पारंपरिक विधींनी प्रेरित असून भक्तीचा अनुभव उन्नत करण्यासाठी त्याचे निर्मिती करण्यात आली आहे. यातील प्रत्येक बॉक्समध्ये 12 सांबरानी कप आणि एक पितळी धुनी यांचा समावेश आहे. आसमंतात मातीचा सुगंध पसरविण्यासाठी तसेच पूजेच्या वेळेस कालातीत आणि पवित्र वातावरण तयार करण्यासाठी ते सर्वथा योग्य आहे. या नवीन उत्पादनाविषयी बोलताना सायकल प्युअर अगरबत्तीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अर्जुन रंगा म्हणाले, "ऐन दिवाळीच्या मुहूर्तावर उत्पादनांची ही मालिका सादर करताना आम्हाला आनंद होत आहे. हा सण म्हणजे एकत्र येण्याचा आणि प्रार्थनेचा काळ असतो, त्यामुळे भक्तांना पूजेचा आनंददायक अनुभव मिळावा, ही सुनिश्चित करण्यासाठी सर्वोत्तम दर्जाचे उत्पादने पुरविण्यासाठी आमचे प्रयत्न असतात." ब्रँड च्या वतीने नैवेद्य सांबरानी गोल्ड सीरीज कलेक्शन हेही सादर करण्यात आले आहे. यात नैसर्गिक सुगंधांची एक विस्तृत श्रेणी आहे. सांबरानी कप तीन प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत - गुलाब, चंदन आणि मोगरा. ते कोळशापासून मुक्त आहेत आणि दिवाळीच्या वेळेस घरात प्रकाश आणि सुगंधाचे स्वागत करण्यासाठी ते उत्तम आहेत. याचा 18 सांबरानी कप आणि एक होल्डर असलेला संच दिवाळीनिमित्त भेट देण्यासाठी आदर्श आहे. आपल्या सुगंधाने हा परिसर भरून टाकतो आणि सण साजरा करण्यासाठी किंवा दैनंदिन विधींसाठी तो आदर्श आहे. याशिवाय, कापूर हा त्याच्या शुद्धीकरण आणि आराम पुरविण्याच्या गुणधर्मासाठी सुप्रसिद्ध आहे. नवीन सादर करण्यात आलेले एअरकर्पूर वेलबींग कलेक्शन ही एक विशिष्ट मालिका असून ती सर्वांगीण कल्याणावर केंद्रित आहे. यातील प्रत्येक उत्पादन माईंडफुलनेस आणि रिलॅक्सेशन यांना मदत करण्यासाठी घडविण्यात आले आहे. या किटमध्ये आपले कपडे, ड्रॉवर आणि स्टोरेज युनिटला ताजेतवाने ठेवण्यासाठी एक कापराचे पाकीट, कपडे, स्टोरेजची जागा आणि नाजूक वस्तूंना ताजेतवाने करण्यासाठी कापराचा सुवास सोडणारे कापराचे सॅशे, डोकेदुखी, नाकचंदने, स्नायूदुखी आणि सर्दी यांपासून आराम देण्यासाठी कॅम्फर रोल-ऑन, कॅम्फर व्हेपरायझर आणि डासांना हाकलण्यासाठी लिक्विड, तसेच कापराच्या सुगंधाने आसमंत भरून टाकणारे एअर फ्रेशनर यांचा समावेश आहे. प्रत्येक भक्ताच्या उत्सवाच्या गरजांसाठी खास तयार केलेल्या नवीन मालिकांसह दिवाळीचे सार अनुभवा. हेरिटेज डिव्हाईन धूप शक्ती कलेक्शनची किंमत 2,999 रुपये असून ते सायकल डॉट इन आणि फ्लिपकार्टवर उपलब्ध आहे. नैवेद्य सांबरानी गोल्ड सिरीज कलेक्शन 375 रुपयांना फ्लिपकार्ट आणि अॅमेझॉनवर उपलब्ध आहे, तर एअरकर्पूर वेलबींग कलेक्शन 1,290 रुपयांना फ्लिपकार्ट आणि अॅमेझॉनवर उपलब्ध आहे.



## थोडक्यात



### निवडणूक खर्च निरीक्षकांची माध्यम कक्षाला भेट

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघांसाठी नियुक्त निवडणूक खर्च निरीक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या माध्यम संनियंत्रण व जनसंपर्क कक्षाला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. विविध विधानसभा मतदार संघांसाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सुमीत कुमार, प्रेम प्रकाश मीना, उमेश कुमार, अमीत कुमार आणि ए.वेंकादेश बाबू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी दिलेल्या भेटीप्रसंगी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सुहास दिवसे, पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर, जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्ष समन्वय अधिकारी डॉ. रवींद्र ठाकूर, सहायक संचालक जयंत कर्पे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्र विद्या विभागाचे सहायक प्राध्यापक योगेश बोराटे उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार निवारण व मतदार मदत कक्ष कार्यान्वित

**पुणे (आरंभ पर्व) :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार निवारण व मतदार मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून या कक्षाचा टोल फ्री क्रमांक 1950 असा आहे.या कक्षात मतदारांना मार्गदर्शन करण्यासोबतच तक्रारी स्वीकारण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नागरिकांना कक्षाच्या टोल फ्री क्रमांकावर तक्रार करता येईल. तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीकरीता तात्काळ पाठविण्यात येते. या कक्षाकडे दूरध्वनीद्वारे नवीन मतदान ओळखपत्र, ओळखपत्रात दुरुस्ती, मतदार यादीत नावनोंदणी, ऑनलाइन पद्धतीने ओळखपत्र काढताना येणाऱ्या अडचणीबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा नियत्रंण कक्षाच्या समन्वय अधिकारी ज्योती कावरे यांनी दिली आहे.

### 14 एकर जागेच्या मानीव अभिहस्तांतरणचा अर्ज अमान्य

**पुणे (आरंभ पर्व) :** कोथरूड येथील सुमारे 14 एकर जागेचे एकत्रित मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी इंदिरा शंकर नगरी सहकारी गृहरचना संस्था संघाने (फेडरेशन) केलेला अर्ज जिल्हा उपनिबंधकांनी अमान्य केला आहे. फेडरेशनची नोंदणी रद्द झाल्यामुळे आणि मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी केलेले कोणतेही कारण राहिले नाही, असे कारण जिल्हा उपनिबंधकांनी दिले आहे. इंदिरा शंकर नगरी हा सुमारे 14 एकरच्या परिसरात असलेल्या सोसायट्यांचा विषय आहे. या सोसायट्यांना कोणतीही पूर्व कल्पना न देता आणि त्यांची मान्यता न घेता इंदिरा शंकर नगरी सहकारी गृहरचना संस्थांचा संघ (फेडरेशन) मर्यादित स्थापन करण्यात आला होता. या फेडरेशनच्या नावाने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन संपूर्ण परिसराच्या पुनर्विकासासाठी बांधकाम व्यावसायिकांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. तसेच फेडरेशनच्या नावाने संपूर्ण परिसराचे मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी जिल्हा उपनिबंधकांकडे अर्ज करण्यात आला. उपनिबंधकांकडून सोसायट्यांना नोटिसा आल्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. त्यामुळे वीस ते बावीसहून अधिक सोसायट्यांनी विरोध केल्यामुळे आणि 'सकाळ'ने वाचा फोडल्यानंतर कोथरूड परिसरात हा चर्चेचा विषय झाला होता, तर फेडरेशनने जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे मानीव अभिहस्तांतरणासाठी केलेल्या अर्जाच्या विरोधात या सोसायट्यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे अर्ज दाखल केला होता.

## मलाबार गोल्ड ॲण्ड डायमंड्सकडून दिवाळीतील

# खरेदीवर ग्राहकांना मिळणार आकर्षक सोन्याची नाणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जगातील सर्वात मोठ्या दागिने विक्रेत्यांपैकी एक असलेल्या मलाबार गोल्ड ॲण्ड डायमंड्सने दिवाळीसाठी खास ऑफर सुरू केल्या आहेत. प्रत्येक खरेदीसह ग्राहकांना हमी दिलेली सोन्याची नाणी आणि सोन्याच्या किंमतीतील बदलांपासून त्यांचे रक्षण करण्यासाठी दर संरक्षण योजनेचा लाभ देऊ करण्यात आला आहे. ही योजना सोने, हिरे आणि मौल्यवान खड्यांच्या दागिन्यांवर उपलब्ध आहेत.




राजस्थानमधील जोधपूर येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात बॉलीवूड अभिनेते आणि मलाबार गोल्ड ॲण्ड डायमंड्सचे ब्रॅण्ड ॲम्बॅसेडर अनिल कपूर यांनी या उत्सवी ऑफर्सचे अनावरण केले. या कार्यक्रमाला भारतातील कारभाराचे व्यवस्थापकीय संचालक, ओ. आशर, क्षेत्रीय प्रमुख (उत्तर) एन. के. जिशाद आणि विभागीय प्रमुख (उत्तर) के. पी. अनीस बशीर यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

मलाबार समूहाचे अध्यक्ष एम. पी. अहमद म्हणाले, "ग्राहकांच्या समाधानाला प्राधान्य देणारी आभूषण विक्रेते म्हणून, या खास दिवाळी ऑफर सादर करताना आम्हाला आनंद होत आहे. आमच्या ग्राहकांना अतुलनीय फायदे आणि एक अपवादात्मक खरेदी अनुभव देऊन त्यांच्यासाठी सणाचा हंगाम आणखी खास बनवण्याचे आमचे ध्येय आहे. जागतिक स्तरावर अग्रगण्य आभूषण विक्रेते बनण्याइतके कमावलेले यश हे आमच्या मौल्यवान ग्राहकांच्या सातत्यपूर्ण विश्वास आणि पाठबळाचीच पावती आहे."

मलाबार गोल्ड ॲण्ड डायमंड्सच्या सर्व शोरूममध्ये 3 नोव्हेंबरपर्यंत वैध असलेल्या या दिवाळी ऑफर्समध्ये 50,000 रुपये आणि त्या पुढील खरेदीवर सोन्याची नाणी : सोन्याचे दागिने खरेदी करणाऱ्यांना 200 मिलीग्राम, मौल्यवान, अनकट आणि पोल्की ज्वेलरी खरेदी करणाऱ्यांना 300 मिलीग्राम आणि हिरेजडित दागिने खरेदी करणाऱ्यांना 400 मिलीग्राम सोन्याचे नाणी मिळविता येतील. सोने दर संरक्षण योजना ग्राहकांना फक्त 10 टक्के अग्रिम देयक भरणा (डाउन पेमेंट) करून दागिन्यांचे बुकिंग करणाऱ्या ग्राहकांस मिळेल. बुकिंग किंवा खरेदीच्या तारखेदरम्यान कोणताही कमी दर निवडण्याची त्यांना मुभा असेल.

या व्यतिरिक्त, ग्राहक जुन्या सोन्याची देवाणघेवाण करताना नवीन डिझाइन्सचा फायदा घेऊ शकतील. दिवाळीच्या खरेदीचा अनुभव आणखी वाढवण्यासाठी खास सवलतीच्या दागिन्यांचे संग्रहण असलेले विशेष 'बाय काउंटर्स' देखील सुरू करण्यात आली आहेत.

## शासकीय कर्मचाऱ्यांनी हेल्मेट वापरणे बंधनकारक : डॉ. पुलकुंडवार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे विभागातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, महाविद्यालये तसेच शासकीय यंत्रणांच्या कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना दुचाकी वाहन वापरताना हेल्मेट वापरणे बंधनकारक करण्यात आले असून याचे पालन सर्व संबधितांनी करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले आहेत. नियमभंग करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर संबंधित प्राधिकरणाने दंडात्मक कारवाई करून त्यांच्या सेवा पुस्तकातही कारवाईची नोंद घ्यावी, अशा सूचनादेखील त्यांनी दिल्या आहेत.

यासंबंधीचे परिपत्रक डॉ. पुलकुंडवार यांनी जारी केले आहे. मोटार वाहन कायदा, 1988 च्या कलम 129 नुसार तसेच उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार दुचाकी चालविणाऱ्या तसेच दुचाकीवर पाठीमागे बसणाऱ्या व्यक्तीने हेल्मेट परिधान करणे बंधनकारक आहे. मोटार वाहन कायद्यातील तरतूदींचे पालन करणे प्रत्येक शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे.

## झेल एज्युकेशनकडून विशेष गोलमेज परिषदेचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

झेल एज्युकेशनने विशेष गोलमेज परिषदेचे यशस्वीरित्या आयोजन केले, ज्यामध्ये भारतभरातील टॉप युनिव्हर्सिटीजमधील प्रतिष्ठित कुलगुरू व डिन्स एकत्र आले आणि त्यांनी फायनान्स एज्युकेशनच्या भविष्याबाबत चर्चा केली. या इव्हेण्टची प्रमुख सहयोगी डिलॉइट होती. या इव्हेण्टचा शैक्षणिक संस्था व उद्योगामध्ये हरित सहयोगाला चालना देण्याचा मनसुबा आहे, ज्यामुळे विद्याथ जगभरात विकसित होत असलेल्या कर्मचारीवर्गाच्या मागण्यांची पूर्तता करण्यास आणि अत्याधुनिक शैक्षणिक दृष्टीकोनांचा शोध




घेण्यास सक्षम होतील.

फिनटेकसारखे उदयोन्मुख ट्रेण्ड्स आणि ॲन्व्हायरोन्मेंटल, सोशल ॲंड गव्हर्नन्स (ईएसजी) तत्त्वांवर लक्ष केंद्रित केलेली ही गोलमेज परिषद फायनान्स एज्युकेशनमधील सर्वांगिण परिवर्तनाला प्रेरित करण्यासाठी डिझाइन करण्यात आली होती. शैक्षणिक संस्था व उद्योगामधील तज्ञांनी आर्थिक व्यावसायिकांच्या भावी पिढीला भावी जागतिक अर्थव्यवस्थेमधील गुंतागूंतींचे निराकरण करण्यास सक्षम करण्यासाठी सर्वोत्तम मार्गांबाबत चर्चा केली.

झेल एज्युकेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सह-संस्थापक प्रथम बरोट म्हणाले, झेल एज्युकेशनमध्ये आमचा विश्वास आहे की, फिनटेक व ईएसजीचे भविष्य निपुण प्रमुखांवर अवलंबून आहे, जे या संकल्पनांना शाश्वत व्यवसाय मॉडेल्समध्ये एकीकृत करू शकतात. आमचा विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रायोगिक अध्ययनाद्वारे संपादित केलेल्या व्यावहारिक कौशल्यांसह सक्षम करण्याचा मनसुबा आहे. उद्योग सहयोगींसोबत सहयोग करत आम्ही शैक्षणिक पाथवेज तयार करत आहोत, जे विद्यार्थ्यांना भावी आर्थिक लँडस्केपमधील गुंतागूंतीच्या आव्हानांचे निराकरण करण्यासाठी सक्षम करतील.

## ज्योतिष वास्तुविद्या शास्त्राचा व्यापक प्रसार ही काळाची गरज : अनिल चांदवडकर

### ज्योतिष वास्तु विश्व संशोधन केंद्रातर्फे पुरस्कार वितरण आणि पदवी प्रदान समारंभ उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ज्योतिष आणि वास्तुविद्या हे विज्ञान नाही किंवा त्याला कोणताही ठोस आधार नाही, हा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. ज्योतिष वास्तुविद्या शास्त्र विज्ञानाला धरूनच असून दैनंदिन जीवनात त्याची आवश्यकता आहे. या शास्त्राचा व्यापक प्रमाणावर प्रचार आणि प्रसार करण्याची आज आवश्यकता असल्याचे मत ज्योतिषाचार्य अनिल चांदवडकर यांनी व्यक्त केले. ज्योतिष वास्तु विश्व संशोधन केंद्रातर्फे आयोजित पुरस्कार वितरण आणि पदवी प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. पुण्यातील पद्मावती भागातील विणकर सभागृहात हा कार्यक्रम




उत्साहात पार पडला. ज्योतिष शास्त्रातील भरीव योगदानासाठी रत्नमाला रमेश कुलकर्णी यांच्या हस्ते अनिल चांदवडकर यांना रत्नमाला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी ॲड. सुनिता पागे यांनी संस्थेचे कौतुक करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष वेदमूर्ती उमेश रमेश कुलकर्णी गुरुजी यावेळी उपस्थित होते. उमेश कुलकर्णी म्हणाले, वास्तुशास्त्र चार भिंतीचे शास्त्र नसून वास्तुशास्त्र हे जगण्याचे शास्त्र आहे. आपण लाखो, करोडो रुपयांचे घर विकत घेऊन समस्या विकत घेतो. या समस्यांपासून मुक्ती मिळवण्यासाठी एक लाख वास्तुतज्ञ घडवण्याचा संकल्प हाती घेतला आहे. या शास्त्राचा उपयोग करून आपले जीवन सुखी, निरोगी, आनंदी बनविण्यासाठी प्रत्येकाने हे शास्त्र शिकणे गरजेचे आहे. अथर्ववेदाचे उपवेद असलेल्या स्थापत्यशास्त्रामध्ये वास्तुशास्त्राचा समावेश होतो. त्यामुळे वैदिक संस्कृती वाचविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा उचित सन्मान व्हावा यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लेखिका प्रिया मालवणकर शारदा पुरस्कार, ज्योतिष व काव्य पुस्तक लिखाणासाठी अंजली पोतदार यांना अक्षरलक्ष्मी पुरस्कार, वेदमूर्ती अनिरुद्ध इनामदार गुरुजी यांना वेदमार्ग दीपस्तंभ, उज्वला संख्ये यांना वास्तु विशारद, सागर घोडेराव यांना वास्तुभूषण, महेश कुलकर्णी यांना लोलक विशारद, सिद्धांत ओझरकर यांना अंक विशारद तर नितीन पेंडसे, श्रुती पिसे यांना वास्तुरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रिया मालवणकर, अनिरुद्ध इनामदार व यशस्वी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांनी वास्तुशास्त्र, ज्योतिष, लोलक विद्या यांमुळे आपल्या जीवनात कसे परिवर्तन झाले तसेच, आपल्या मार्गदर्शनाने सर्वसामान्य लोकांच्या आयुष्यातही झालेल्या अमुलाग्र बदलांची माहिती उपस्थितांना दिली. त्यातून या शास्त्रांचा उपयोग जीवनातील समस्या सोडविण्यासाठी कसा केला जाऊ शकतो, हे पटवून दिले. त्यामुळे या शास्त्रांचे महत्त्व किती मोठे आहे, हे उपस्थितांच्या लक्षात आले.

# मधुमेहाच्या एकात्मिक व्यवस्थापनासाठी सहयोगात्मक संशोधन प्रकल्प

- **चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूट (पुणे), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (नाशिक), अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान (दिल्ली) यांचा मधुमेह व्यवस्थापन क्षेत्रातील प्रवर्तक संशोधन प्रकल्पात सहभाग**
- **मधुमेह व्यवस्थापनात पारंपरिक आयुर्वेद उपचार पद्धती ॲलोपॅथिक औषधांसमवेत परस्परपूरक सहयोग कसा स्थापन करु शकते, हे शोधण्यावर संशोधनाचा भर**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नाशिक स्थित महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि पुण्यातील चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूट यांनी संशोधन, शिक्षण व शुश्रूषात्मक निगा या माध्यमातून मधुमेह व्यवस्थापनाच्या विविध पैलूंवर विचारार्थ सहयोग केला आहे. यातील संयुक्तरीत्या शोधली जाणारी एक प्रमुख कल्पना म्हणजे मधुमेह व्यवस्थापनात एकात्मिक उपचार पद्धतींची भूमिका शोधणे म्हणजेच आयुर्वेद उपचार पद्धती आधुनिक ॲलोपॅथिक औषधांसमवेत परस्परपूरक सहयोग कसा स्थापन करु शकते याचा तपास करणे, ही आहे.

या सहयोगात्मक संशोधन पुढाकाराचे उद्घाटन चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूटमध्ये




नुकतेच एका कार्यक्रमात झाले. याप्रसंगी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठच्या प्र-कुलगुरु लेफ्टनंट जनरल (निवृत्त) डॉ. माधुरी कानिटकर, प्र कुलगुरु डॉ. मिलींद निकुंभ, ब्रिगेडियर (निवृत्त) सुबोध मुळगुंद ,चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य एंडोक्रिनॉलॉजिस्ट डॉ. उन्नीकृष्णन ए. जी., मुख्य वैद्यकीय संचालक डॉ. हर्षल मोरे आणि दिल्लीस्थित अखिल भारतीय आयुर्वेद संस्थानच्या संचालक डॉ. तनुजा नेसरी उपस्थित होते.

डॉ.माधुरी कानिटकर आपल्या भाषणात म्हणाल्या, "आजच्या जगात विविध शिक्षण शाखांमधील सीमारेषा धूसर होत असून सध्याचे विविध शाखांमधील भिंती पाडून एकत्र काम करण्याची गरज आहे. तेव्हाच आपण भारतातील मधुमेहाच्या वाढत्या ओझ्याला तोंड देऊ शकू."

डॉ. उन्नीकृष्णन ए. जी. म्हणाले, की मधुमेह व्यवस्थापनात एक बहुशाखीय दृष्टीकोन नवी दिशा देऊ शकेल आणि इतर असंसर्गजन्य रोगांच्या उपचारांत नव्या वाटाही उघडेल."

डॉ. मिलींद निकुंभ म्हणाले, "व्यक्तीच्या प्रकृतीवर आधारित मधुमेहाच्या समस्येवर उपचाराचा आयुर्वेदाचा एक वेगळा दृष्टीकोन असला तरी आधुनिक औषधांशी समन्वय साधण्याचे मोठे सामर्थ्यही त्यात आहे आणि तेच या सहयोगात्मक अभ्यासातून साधण्याचे ध्येय आहे."

डॉ. तनुजा नेसरी म्हणाल्या, " अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान ही आयुर्वेदातील संशोधनाचा प्रसार करणारी देशातील सर्वोच्च संस्था आहे आणि मधुमेह व्यवस्थापनात एकात्मिक अभ्यासाची अमलबजावणी करण्यात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व इतर संस्थांशी सहयोग करताना आम्हाला आनंद होत आहे."

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.